# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwater@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

जा.क्र. मप्रनि/ससं(जप्रनि)/परिपत्रक/ब- ०९५८

दिनांक २३/०१/२०२३

**परिपत्रक क्रमांक — १६० /२०२३**

**विषय:** संमतीपत्रासाठीचे अर्ज प्रकल्पधारक /बांधकाम व्यवसायिक / उद्योजक यांचे संमतीपत्र अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे सादर करताना उप-प्रादेशिक कार्यालयाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत...

**संदर्भ:** **१.** संमतीपत्र मुल्यांकन समितीच्या, संमतीपत्र समितीच्या बैठकांमध्ये झालेल्या चर्चा.
**२.** मंडळाचे गुंतवणूकीबाबतचे परिपत्रक दि. MPCB/AB/८८, दि. १८.०१.२०१६.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कारखान्यांना व बांधकाम व्यावसायिकांना संमतीपत्र प्रदान करते. यासंदर्भात पर्यावरण आघात मुल्यांकन, २००६ च्या नुसार बांधकाम व्यावसायिक यांना दिल्या जाणाऱ्या पर्यावरणीय मंजूरी (Environmental Clearance) देत असताना त्यामध्ये म.प्र.नि. मंडळाकडून संमतीपत्र घ्यावे अशी अट टाकण्यात येते, त्यानुसार पर्यावरण आघात मुल्यांकन २००६ मधील अधिसूचित केलेल्या उद्योजकांना बांधकाम व्यावसायिकांना संमतीपत्र जल व हवा कायदा तसेच पर्यावरण संरक्षण कायद्यातील नियमांनुसार घेणे बंधनकारक आहे. म.प्र.नि. मंडळाने प्रकल्प सुरू करण्याआगोदर व प्रकल्प सुरू करताना संमतीपत्र घेण्याचे बंधनकारक केलेले आहे व त्यानुसार नियमाप्रमाणे अर्ज करणाऱ्यांना म.प्र.नि. मंडळ संमतीपत्र प्रदान करते.

मागील काही दिवसांमध्ये असे आढळून आले आहे की, सनदी लेखापाल (CA) देत असलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे मंडळामध्ये संमतीपत्र प्रदान केले जात होते. तसेच काही ठिकाणी ऑडीटेड बॅलेन्स शिटच्या आधारे संमतीपत्राची फी घेतली जात होती. मध्यंतरीच्या काळात ऑडीटर जनरल (AG Audit) यांचे लेखापरीक्षणा दरम्यान त्यांनी प्रकल्पाचे संमतीपत्राचे नूतनीकरण करताना सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र घेतले पण त्यावेळेस ऑडीटेड बॅलेन्स शिट (लेखा परिक्षित ताळेबंद) न घेतल्यामुळे प्रकल्पाची एकत्रीत गुंतवणूक ही कमी दाखवली गेली असल्याचे निदर्शनास आले व त्यामुळे मंडळाचा फी स्वरूपात मिळणारा महसूल कमी झाल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे काही प्रकल्पांनी टप्प्या-टप्प्याने मंडळाकडून संमतीपत्र प्राप्त करताना पर्यावरणीय मंजूरीतील दर्शविण्यात आलेली एकूण गुंतवणूकीपेक्षा कमी रक्कम सनदी लेखापालांच्या प्रमाणपत्रामध्ये दर्शविण्यात आल्याचे दिसून आले.

तरी याबाबत या आदेशानुसार सर्व उप-प्रादेशिक कार्यालयांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत –

१. सर्व संमतीपत्रासाठीचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर भांडवली गुंतवणूक (Capital Investment) नूतनीकरणाच्या वेळेस ऑडीटेड बॅलेन्स शिट प्रमाणेच घ्यावी. मंडळाचे संदर्भ क्र. २ च्या परिपत्रक क्र. MPCB/AB/८८, दि. १८.०१.२०१६ प्रमाणे भांडवली गुंतवणूकीची तपासणी कशी करावी याबाबत मार्गदर्शन केलेले आहे तरी या परिपत्रकाप्रमाणेच अर्जाची छाननी करावी. फक्त प्रस्तावित प्रकल्पांनाच पहिल्या वेळेस सनदी लेखापालांच्या प्रमाणपत्राप्रमाणे दर्शविलेली भांडवली गुंतवणूक ग्रहीत धरावी.

२. प्रकल्प धारकाने भांडवली गुंतवणूक दर्शवताना कुठल्या टप्प्याचे (Phased Manner) बांधकाम करत आहे त्याबाबत भांडवली गुंतवणूक दर्शवावी व मप्रनि मंडळातील अधिकाऱ्यांनी एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या प्रकल्पांचे आडीटेड बॅलेन्स शिट प्रमाणेच फी ची रक्कम ठरवावी.

३. उदा. एखाद्या ग्रुपची बॅलन्स शिट असेल तर त्या ग्रुपमधील सर्व प्रकल्पांची वेगवेगळी प्रकल्पनिहाय फोड करून सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र बॅलेन्स शिट सह सादर करावे.

४. एखाद्या प्रकल्पाने चौथ्या टप्प्यासाठी अर्ज केला असल्यास पहिल्या तीन टप्प्यांची माहिती घेऊन त्या टप्प्यांना संमतीपत्र वैध असल्याची खात्री करून घ्यावी व त्यानंतरच चौथ्या टप्प्याचा अर्ज मान्यतेकरीता शिफारस करावा.

५. पर्यावरणीय मंजूरी प्राप्त झालेल्या प्रकल्पांची प्रकल्प सुरू करताना (C to E) अर्ज करताना पर्यावरणीय मंजूरी (EC) मधील भांडवली गुंतवणूक (Capital Investment) अर्ज करते वेळी दाखविली किंवा नाही याची खात्री करावी.

प्रकल्पांचे संमतीपत्राचे अर्ज सादर करताना सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे माहिती प्रकल्प धारकांकडून घ्यावी व उप-प्रादेशिक कार्यालयाने याची शहानिशा करूनच अर्जासोबत संमतीपत्र प्राधिकृत अधिकाऱ्याकडे पाठवावि यामध्ये चूक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उप-प्रादेशिक कार्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी. तसेच याबाबत प्रादेशिक अधिकारी यांनी या परिपत्रकाच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

सदरील परिपत्रक संमतीपत्र मुल्यांकन समितीच्या दि. १८.०१.२०२३ च्या बैठकीतील चर्चेप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

23.9.2023

डॉ. य. बा. सोनटक्के,
**सहसंचालक (जप्रनि)**

**सोबत:** सहपत्र – १ (Annexure I)
सहपत्रामध्ये प्रकल्पांची माहिती बिनचूक सादर करावी.

**प्रती : -**

**उप-प्रादेशिक अधिकारी** – मुंबई – १ / मुंबई -२/ मुंबई - ३/ मुंबई -४/ ठाणे -१/ ठाणे -२/ तारापूर -१/ तारापूर -२/ नवी मुंबई -१/ नवी मुंबई - २/ तळोजा/ कल्याण -१/ कल्याण -२/ कल्याण -३/ भिवंडी/ रायगड -१ / रायगड -२/ महाड/ कोल्हापूर/ सांगली/ रत्नागिरी/ चिपळूण/ पुणे – १/ पुणे -२/ पिंपरी – चिंचवड/ सातारा/ सोलापूर / औरंगाबाद / जालना/ नांदेड/ नाशिक/ अहमदनगर/ जळगाव/ धुळे / नागपूर -१/ नागपूर -२/ भंडारा/ चंद्रपूर/ अमरावती-१/ अमरावती -२/ अकोला/ परभणी/ लातूर/ चंद्रपूर.

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :-**

**प्रादेशिक अधिकारी** – मुंबई / ठाणे / कल्याण /रायगड / नवी मुंबई / पूणे/ नाशिक/ नागपूर / औरंगाबाद / कोल्हापूर / अमरावती / चंद्रपूर.

**प्रत माहितीसाठी सादर:**

१. मा. अध्यक्ष, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई.
२. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई.

**प्रत माहितीसाठी:**

सहसंचालक (हप्रनि)/ प्रधान वैज्ञानिक अधिकारी / सहाय्यक सचिव (तांत्रिक)/ प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय) / प्रादेशिक अधिकारी (जै. वै. क.), म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई.

| Sr. No. | Name of Project | Environment Clearance | | | | | Consent to Establish | | | | Consent to Operate/Renewal | | | | CC/OC | Remark/ Present status and violation if any. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Date | Capital investment (Crs.) | Area | | Amendment /extension | Date | Capital investment (Crs.) | Area | | Date | Capital investment (Crs.) | Area | | | |
| | | | | Total Plot area (Sq. mtrs.) | Total Built up area (Sq. mtrs.) | | | | Total Plot area | Total Built up area | | | Total Plot area | Total Built up area | | |
| 1 | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

1. Compliance of EC with specific conditions.

2. Compliance of Consent Conditions.

3. Audited Balance Sheet & if required Multi Unit CA certificate.

4. The information of Infra project use one Sr. No. for each Phase of CtoE/CtoO